सदस्यांची नियुक्ती सुरु; तीन महिन्यात वक्फ बोर्ड अस्तित्वात येणार : नलाब मलिक

औरंगाबाद : वक्फ बोर्डाच्या सदस्यांची नियुक्ती प्रक्रिया सुरू केली आहे. पुढील तीन महिन्यांमध्ये ही प्रक्रिया पूर्ण होईल. त्याचप्रमाणे कायमस्वरूपी सीईओ नियुक्त करण्यात येणार असल्याची माहिती वक्फमंत्री नवाब मलिक यांनी दिली.

मलिक यांनी सोमवारी सकाळी सुभेदारी विश्रामगृहात वक्फ बोर्डाच्या काही अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली. त्यानंतर ते विभागीय आयुक्त कार्यालयात मराठवाड्यातील वार्षिक योजनेच्या बैठकीसाठी निघून गेले. दुपारी मोजक्याच पत्रकारांसोबत बोलताना ते पुढे म्हणाले की, आज बोर्डाचा संक्षिप्त आढावा घेतला. बोर्डातील रेकॉर्ड अत्यंत महत्त्वपूर्ण असल्याने ते डिजिटल पद्धतीने सुरक्षित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. कर्मचारी भरतीसाठी शासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. १४० कर्मचारी भरतीसाठी शासने मंजुरी दिलेली आहे. येत्या काही दिवसांत थोडे-थोडे करून ही भरती करण्यात येईल. जिल्हास्तरावर वक्फ बोर्डाचे कार्यालय सुरू करण्याची प्रक्रिया पुढील तीन महिन्यांत पूर्ण होणार आहे. एमआयएमचे खासदार इम्तियाज जलील यांनी वक्फ बोर्डाच्या जागांबाबत मोठा घोटाळा झाल्याचा आरोप केला आहे. या विषयावर मलिक यांनी सांगितले की, इम्तियाज जलील आता बोर्डाचा एक भाग आहेत.

महामार्गाचे प्रकल्प अहवाल बनवणारे निम्मे अभियंते बोगस

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे प्रतिपादन

एकत्रित प्रयत्नातून अपघात रोखणे शक्य

नागपूर : राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागातील रस्त्यांचे सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करणारे निम्मे अधिकारी बोगस आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय भूपृष्ठ वाहतूकमंत्री नितीन गडकरी यांनी केले. नागपुरात राष्ट्रीय रस्ता सुरक्षा अभियानाअंतर्गत कार्यक्रमात ते बोलत होते.

कार्यक्रमाला अभिनेते मकरंद अनासपुरे, खासदार डॉ. विकास महात्मे यांच्यासह नागपुरातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते. गडकरी म्हणाले, देशात करोनामुळे चिंता वाढली. या आजाराने वर्षभरात १.४० लाख मृत्यू झाले; परंतु प्रत्येक वर्षी देशात ५ लाख अपघातात सुमारे दीड लाख मृत्यू होतात. अपघातात मृतांमध्ये सुमारे ७० टक्के व्यक्ती १८ ते ४५ वयोगटातील असतात. नगरसेवक, आमदार, खासदार, लोकप्रतिनिधींसह सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन अपघात नियंत्रणाचे आव्हान स्वीकारल्यास नियंत्रण शक्य



आहे.

आमच्या खात्याने एका रस्ता सुरक्षा प्राधिकरणाची निर्मिती केली. त्यावर लवकरच एका अधिकाऱ्यांची नियुक्ती होईल. या कौन्सिलकडून लवकरच विविध जनजागृतीपर उपक्रम राबवले जातील. सरकारमध्ये संवेदनशीलता नसल्याने रस्ते सुरक्षेबाबतचे काम कौन्सिलकडून होईल. देशातील निम्म्या अपघाताला चुकीच्या रस्त्यांचे इंजिनीअरिंग जबाबदार आहे. त्यामुळे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणात डीपीआर तयार करणारे निम्मे अधिकारी बोगस व फ्रॉड असल्याचे दिसते. ते विविध कारणे पुढे करत अंडर आणि ओव्हर पासमध्येही अडथळे आणतात. राष्ट्रीय महामार्गावर सुमारे १२ हजार कोटी रुपये खर्च करून सर्व अपघातप्रणव स्थळ संपवल्याचा दावा त्यांनी केला. त्यांनी जनआक्रोशसह इतरही संस्थेकडून रस्ता सुरक्षिततेबाबत होणाऱ्या कामाची प्रशंसा केली. फास्टॅगला मुदतवाढ नाही देशातील काही टोल नाके असलेल्या रस्त्यांवर आता ८० ते ९० टक्केपर्यंत फास्टॅगचा वापर होऊ लागला आहे. फास्टॅगची मुदत वाढवली जाणार नसल्याचे गडकरी यांनी सांगितले.

देशात ३० टक्के परवाने बनावट

आतापर्यंत अनेकांना घरबसल्या वाहनचालक परवाने मिळत होते. त्यामुळे आम्ही परवाने आधारशी जोडले. यातून देशातील ३० टक्के परवाने बनावट असल्याचे समोर आले आहे. हे बनावट परवाने रद्द करण्यासाठी प्रक्रिया सुरू असल्याची माहिती गडकरी यांनी दिली. दंडाची रक्कम दहापट वाढवण्याची गरज – अनासपुरे

दहा ते बारा वर्षांपूर्वी मी सिडनीला गेलो होतो. तेथील रस्ते बांधणाऱ्या विजय जोशी यांच्याशी चर्चा झाली. त्या वेळी तेथील टोलही कार्डच्या माध्यमातून स्वयंचलित पद्धतीने घेतले जात होते. हे तंत्रज्ञान भारतीय कंपनी उपलब्ध करत होती. त्यामुळे देशातील कौशल्य बाहेर वापरले जात असून देशात का नाही? हा प्रश्न मनात उपस्थित होत होता; परंतु देशातील रस्ते हे इंजिनीअर नाही तर राजकारणी बांधतात; परंतु गेल्या दहा वर्षांपासून देशात चांगले रस्ते निर्माण होऊ लागले असल्याचे समाधान आहे. त्यात गडकरींचीही भूमिका महत्त्वाची आहे. दरम्यान, समाजात काही लोक बेजबाबदारीने वागून रस्त्यांवरील इतरांचे जीव धोक्यात घालतात. त्यांना आवर घालण्यासाठी दंडाची रक्कम दहापटीहून अधिक आकारूनच त्यावर नियंत्रण शक्य असल्याचे मकरंद अनासपुरे म्हणाले.

फास्टॅगला मुदतवाढ नाही

देशातील काही टोल नाके असलेल्या रस्त्यांवर आता ८० ते ९० टक्केपर्यंत फास्टॅगचा वापर होऊ लागला आहे. फास्टॅगची मुदत वाढवली जाणार नसल्याचे गडकरी यांनी सांगितले.

कोरोनामुळे पगारदारवर्ग संकटात

नागपूर : देशातील पगारदारवर्गाला नेहमीच विविध आव्हानांना तोंड द्यावे लागते. कोरोनामुळे त्यांची परिस्थिती आता अधिकच गंभीर झाली आहे. ते आर्थिक संकटात जगत आहेत.

पगारदारवर्गाचे वेतन महागाईच्या तुलनेत कमी आहे. त्यामुळे त्यांना बचत करता येत नाही. यातच त्यांना प्राप्तिकर व व्यावसायिक करही जमा करावा लागतो. विरोधाभास म्हणजे, शेतकरी कितीही श्रीमंत असला तरी त्यांना कर द्यावा लागत नाही. शहरातील एका प्रसिद्ध चार्टर्ड अकाऊंटंटने नाव जाहीर न करण्याच्या अटीवर दिलेल्या माहितीनुसार, कोरोना काळामध्ये पगारदारवर्गातील चार कोटी व्यक्तींनी कर जमा केला. सरकारने त्या रकमेतून स्थलांतरित मजुरांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या. असे असताना वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये पगारदारवर्गासाठी वजावटीची घोषणा केली नाही.सार्वजनिक क्षेत्रापेक्षा खासगी क्षेत्रातील पगारदारवर्गाची संख्या मोठी आहे. ते कर भरतात, पण त्यांना निवृत्ती वेतन, बेरोजगारी साहाय्य किंवा सेवानिवृत्तीनंतर आरोग्य सेवा मिळत नाही. परंतु, त्यांना आर्थिक परिस्थिती हलाखीची असतानाही कर भरणे बंधनकारक केले जाते.

देशातील बॉलिवूड उद्योग व राजकारणातील अनेक जण स्वतःला शेतकरी घोषित करून अत्यल्प कर जमा करतात. त्यामुळे शेतीमधून वर्षाला १० लाख रुपयावर उत्पन्न मिळविणाऱ्याला कराच्या चौकटीत आणले गेले पाहिजे, असे मत सूत्रांनी व्यक्त केले.देशातील मतदारांमध्ये पगारदारवर्गाची संख्या केवळ ७ टक्के आहे. राजकीय पक्ष त्यांचा गांभीर्याने विचार करीत नाही. त्यामुळे ही विसंगती निर्माण झाली आहे. सरकारच्या विरोधाभासी धोरणामुळे गेल्या काही वर्षांत प्रत्यक्षात कर जमा करणाऱ्यांच्या तुलनेत केवळ प्राप्तिकर अर्ज भरणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढली आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, २०२०-२१ मध्ये ३ कोटी ७५ लाख नागरिकांनी प्राप्तिकर अर्ज भरले, पण प्रत्यक्ष कर जमा करणाऱ्यांची संख्या फार कमी आहे. कोरोना काळात मागणी वाढली असली तरी बाजारामध्ये वस्तू व सेवेचा पुरवठा अद्याप सुरळीत झाला नाही.

६० वर्षांत काय झाले विचारता, पहा महाराष्ट्रातून कोरोना लसींचा जगभरात पुरवठा

औरंगाबाद : देशात कुठेही कोरोना प्रतिबंधात्मक लस तयार होऊ शकत नाही. उत्पादक क्षमता कुठे नाही, पण ही क्षमता महाराष्ट्रात आहे. पुण्यात लसींचे उत्पादन होते, हा महाराष्ट्राचा बहुमान आहे. गेल्या ६० ते ७० वर्षांत काय झाले, असा प्रश्न नेहमी विचारला जातो. पुण्यातून भारतासह जगाच्या कानाकोपऱ्यात लस पोहोचविण्याचे काम होत आहे. लस तयार करण्याच्या जागतिक स्पर्धेत महाराष्ट्राने मान पटकावला आहे, असे म्हणत राज्याचे वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख यांनी सोमवारी विरोधकांचे कान टोचले.

औरंगाबादेतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात (घाटी) शिर्डी संस्थानच्या माध्यमातून प्राप्त एमआरआय यंत्राचे लोकार्पण आणि कोविड योद्धा कर्मचाऱ्यांचा सत्कार अमित देशमुख, पालकमंत्री सुभाष देसाई यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ते बोलत होते. खा. इम्तियाज जलील, आ. धीरज देशमुख, आ. अंबादास दानवे, आ. अतुल सावे, माजी खा. चंद्रकांत खैरे, माजी महापौर नंदकुमार घोडेले, डॉ. कल्याण काळे, अधिष्ठाता डॉ. कानन येळीकर, डॉ. वर्षा रोटे, डॉ. ज्योती इरावणे-बजाज, डॉ. भारत सोनवणे, डॉ. मिनाक्षी भट्टाचार्य, डॉ. सुरेश हरबडे, डॉ. अरविंद गायकवाड, प्रकाश मुगदिया, जितेंद्र देहाडे आदींची उपस्थिती होती. प्रातिनिधीक स्वरुपात डॉ. येळीकर, डॉ. भट्टाचार्य, डॉ. इरावणे-बजाज यांचा मान्यवरांच्या हस्ते कोविड योद्धा म्हणून सत्कार करण्यात आला.

राज्याचे आरोग्य चांगले ठेवेल

अमित देशमुख म्हणाले, आरोग्य, वैद्यकीय शिक्षणासाठी राज्याची अर्थसंकल्पीय तरतूद ६ ते ७ टक्के होण्यासाठी आग्रहाची मागणी केली जाईल. राज्यात प्रोटॉन थेरपी सेंटर उभे करण्यासाठी प्रयत्न केला जाईल. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील सध्याच्या पायाभूत सुविधांतच अभ्यासक्रमाच्या जागा वाढवून अधिक डॉक्टर, परिचारिका निर्माण केले जातील. कोविडवर झालेल्या खर्चाचे राज्य सरकारने अवलोकन केले पाहिजे असे ते म्हणाले.आरोग्याला प्राधान्यक्रम देण्यासाठी एकत्र काम केले जाईल. महाविकास आघाडी सरकार राज्याचे आरोग्य चांगले ठेवेल, असे म्हणत सुभाष देसाई यांनीही विरोधकांना टोला लगावला. एमआरआय यंत्राच्या लोकार्पणानंतर सत्कार समारंभास उपस्थित राहणे आ. सावे यांनी टाळले.घाटीत २०० खाटांचे स्वतंत्र माता व बाल संगोपन केंद्र (एमसीएच विंग) उभारण्यात येईल.

महावितरणचा शॉक, दोन वर्षांत कर्मचाऱ्यांसह ८१ जणांचा बळी

औरंगाबाद : वीज उपकरणातील दोष, खराब वायर्स, अपघातासह वीज उपकरणे हाताळताना झालेला निष्काळजीपणा, अतिधाडस, सुरक्षा साधनांचा वापर करण्याकडे दुर्लक्ष, अशा अनेक कारणांनी विजेचा धक्का बसण्याच्या घटनांत जिल्ह्यात गेल्या २ वर्षांत तब्बल ८१ जणांना प्राण गमवावे लागले. यात महावितरणच्या कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे. गेल्या १० महिन्यांत विजेचा धक्का लागण्याच्या घटनांत विशेषतः ग्रामीण भागात काहीशी वाढ झाली आहे. त्यामुळे चिंता व्यक्त होत आहे.जिल्ह्यात मूक प्राण्यांनाही विजेचा धक्का लागण्याच्या घटना घडल्या. गेल्या दोन वर्षांत ६७ प्राण्यांचा मृत्यू झाला. महावितरणच्या यंत्रणेतील त्रुटींबरोबर मानवी चुकांमुळे विजेचा धक्का लागून जखमी होणे, मृत्यू पावण्याच्या घटना घडत आहेत. विद्युत वाहिनी तुटणे, स्पार्किंग होणे, विद्युत प्रवाह उतरलेल्या खांबाला, ताण वायरला स्पर्श होणे, अशा कारणांनी अपघाताच्या घटना घडतात. घरांमध्ये एखाद्या उपकरणाच्या माध्यमातून विजेचा धक्का लागण्याच्या घटना होतात. तर देखभाल-दुरुस्ती करताना महावितरणच्या कर्मचाऱ्यांनाही विजेच्या अपघाताला तोंड द्यावे लागत आहे. यात कोणी जखमी होतो, तर कोणाचा बळी जातो. गेल्या १० महिन्यांत १० जण विजेचा धक्का लागून जखमी झाले.महावितरणच्या कर्मचाऱ्यांनाही विजेचा धक्का लागण्याच्या घटना समोर आल्या आहे.

'किसान रेल्वे'तून विदर्भातील ६ हजार टन माल निर्यात

नागपूर : शेतकऱ्यांच्या मालाची वाहतूक कमी वेळेत व्हावी यासाठी 'ऑपरेशन ग्रीन'अंतर्गत किसान रेल्वे सुरू करण्यात आली आहे. यामुळे विदर्भातील शेतकरी व विशेषतः संत्रा उत्पादक शेतकऱ्यांची मोठी सोय झाली. अडीच महिन्यांतच किसान रेल्वेच्या माध्यमातून विदर्भातील ६ हजार टनांहून अधिक माल निर्यात करण्यात आला व केवळ संत्र्याच्या मालवाहतुकीतून रेल्वेला सुमारे दोन कोटींचा महसूल प्राप्त झाला. माहितीच्या अधिकारातून ही बाब समोर आली आहे.

उपराजधानीतील माहिती अधिकार कार्यकर्ते अभय कोलारकर यांनी माहितीच्या अधिकारांतर्गत मध्य रेल्वेला विचारणा केली होती. 'ऑपरेशन ग्रीन'अंतर्गत नागपुरातून किती माल बाहेर पाठविण्यात आला, रेल्वे वाहतुकीतून किती महसूल प्राप्त झाला आदी प्रश्न त्यांनी विचारले होते. मध्य रेल्वेकडून प्राप्त झालेल्या अधिकृत माहितीनुसार, अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयातर्फे 'ऑपरेशन ग्रीन' सुरू करण्यात आले. किसान रेल्वेतून माल पाठविल्यास शेतकऱ्यांना वाहतूक खर्चात ५० टक्के सवलत मिळेल, असे १३ ऑक्टोबर रोजीच्या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले.

महिला एसटी चालकांच्या हातचे स्टिअरिंग केले 'जाम'

निवड प्रक्रिया अर्ध्यावरच थांबली

औरंगाबाद : राज्यातील एसटीनेमहिला सक्षमीकरण आणि मनोधैर्य वाढविण्याचा मोठा गाजावाजा करून महिला चालकांची भरती प्रक्रिया राबवण्यात आली. त्यासाठी महिलांची नियुक्ती करण्यात आली. विभागात ३२ महिलांचे प्रशिक्षणही सुरू करण्यात आले होते; परंतु कोरोनाच्या नावाखाली प्रशिक्षण स्थगित करून महिलांच्या हाती येणारे एसटीचे स्टिअरिंगच 'जाम' केले गेले आहे.

एसटी महामंडळाने महिलांच्या हाती बसचे स्टिअरिंग देण्याचा निर्णय झाला. पहिल्या टप्प्यात १६३ महिला चालक तथा वाहकांची निवड केली. या महिलांना पुणे येथे २३ ऑगस्ट २०१९ ला बालगंधर्व रंगमंदिरात झालेल्या समारंभात माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते नियुक्तीपत्रे देऊन त्यांच्या प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. देशातील पहिला उपक्रम ज्यातून महिलांचे सक्षमीकरण करून त्यांना रोजगार उपलब्ध करून देत असल्याचा गाजावाजा केलेल्या या उपक्रमाला मोठी प्रसिद्धीही मिळाली.

सुरुवातीला पुण्यातील भोसरी येथील प्रशिक्षण केंद्रात आणि त्यानंतर त्यांच्या विभाग अथवा जिल्हास्तरावर अवजड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण देण्यात येणार होते. औरंगाबाद आणि नाशिक प्रदेशासाठी चालकपदासाठी ३२ महिलांच्या निवडीत औरंगाबाद विभागातील ६ महिलांचा समावेश होता. त्यानंतर कोरोनाच्या नावाखाली एसटी महामंडळाने १७ जुलै रोजी एका पत्राद्वारे सरळसेवा भरतीअंतर्गत चालक तथा वाहकांचे प्रशिक्षण तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्याची सूचना विभाग नियंत्रकांना केली. त्यानुसार औरंगाबादेत प्रशिक्षण थांबविण्यात आले आहे. मात्र, हातचा कामधंदा सोडून प्रशिक्षण घेणाऱ्या महिला आता चिंतेत असून, प्रशिक्षण पुन्हा कधी सुरू होईल, याची विचारणा करत आहेत.

विभागात ३२ महिलांना प्रशिक्षण

निवड झालेल्या ३२ महिलांचे ३ फेब्रुवारी २०२० पासून औरंगाबादेत जड वाहन चालविण्याचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले होते. वर्षभराच्या प्रशिक्षणानंतर या सर्व महिला एसटीचालक म्हणून रुजू होणार असल्याचे सांगण्यात आले होते. या प्रशिक्षणात विभागातील ६ महिलांचा समावेश होता. त्यानंतर कोरोनाकाळात जुलै २०२० मध्ये एका परिपत्रकाद्वारे हे प्रशिक्षण स्थगित करण्यात आले. काही कालावधीनंतर झालेली निवडच रद्द होण्याची अन् एसटीत चालक म्हणून रुजू होण्याच्या स्वप्नांवर पाणी फेरले जाण्याची भीती निवड झालेल्या महिला उमेदवारांतून व्यक्त होत आहे. एसटीत चालक म्हणून रुजू होणार म्हणून खूप आनंद झाला होता.

'इथं काय गाठोडं ठेवलंय का'?

सोशल डीस्टसिंगचा फज्जा उडवणाऱ्यांना अजित दादांचा टोला

औरंगाबाद : कोरोनाकाळात सर्वसामान्य जनता सरकारच्या सूचनांचे काटेकोर पालन करत असतांना राजकीय पक्षांचे कार्यकर्तेच ठिकठिकाणी गर्दी करत असल्याचा प्रत्यय थेट उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आला. त्यामुळे या शिष्टमंडळांना उद्देशून त्यांनी 'इथं काय गाठोडं ठेवलंय का' असा टोला लगावला.

अक्षरशः लोटालोटी व आरडाओरड्यात सोशल डिस्टन्सिंगचे भान हरपलेल्या व अर्धेअधिक विनामास्क येणाऱ्या कार्यकर्त्यांच्या अनेक शिष्टमंडळांनी सुभेदारी विश्रामगृहावर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची भेट घेतली. वार्षिक नियोजन आराखड्याची बैठक सायंकाळी ५ वाजून १० मिनिटांनी संपल्यानंतर पवार यांचे विभागीय आयुक्त कार्यालयातून सुभेदारी विश्रामगृहावर आगमन झाले. तेथे आधीच अनेक शिष्टमंडळांची मोठी गर्दी झालेली होती. अनेकांच्या हातात मागण्यांची निवेदने व पवार यांच्या स्वागतासाठी पुष्पगुच्छ होते. सुभेदारीवर पोलीस बंदोबस्तही तगडा होता. अजित पवार यांचे आगमन होताच त्यांना भेटण्यासाठी लोटालोटी सुरू झाली. त्यामुळे

पोलिसांनी प्रारंभी दरवाजे बंद करून घेतले नंतर शिष्टमंडळांना प्रवेश दिला जाऊ लागला तेव्हा पुन्हा लोटालोटी सुरू झाली. काहींनी आरडाओरड केली. रेटारेटीत सुरक्षित अंतराचा फज्जा उडवतच ही शिष्टमंडळे उपमुख्यमंत्र्यांना भेटली.

सायंकाळी सहा-साडेसहा वाजेपर्यंत एकानंतर एक शिष्टमंडळे भेटत राहिली नंतर त्यांनी पोलीस आयुक्त निखिल गुप्ता व पोलीस अधीक्षक मोक्षदा पाटील यांच्याशी चर्चा केली.सुभेदारीच्या मुख्य सभागृहातील बाजूच्या सूटमध्ये उभे राहूनच उपमुख्यमंत्र्यांनी ही निवेदने स्वीकारली. काही शिष्टमंडळे सभागृहातच पवार यांची वाट पाहत बसली होती.

डेक्कन जिमखाना परिसरातील रस्त्यावर आता 'नो पार्किंग'झोन

पुणेः डेक्कन जिमखाना येथील गुडलक हॉटेल शेजारच्या गल्लीत नागरिकांकडून बेशिस्तपणे वाहने पार्क करण्यात येत होती. यामुळे परिसरातील नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. मागील काही वर्षांपासून नागरिकांकडून या बेशिस्तपार्किंग विरोधात आवाज उठवला जात होता. अखेर पुणे वाहतूक शाखेकडून हॉटेल गुडलक ते सुवर्णस्मृती मंगल कार्यालयापर्यंतच्या रस्त्यावरील दुतर्फा वाहने पार्क करण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे. याबाबतचे आदेश वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त राहुल श्रीरामे यांनी दिले आहे. यामुळे या परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

गुडलक हॉटेलच्या शेजारच्या गल्लीत वाहने पार्क करण्यास परवानगी देण्यात आली होती.मात्र दिवसेंदिवस याठिकाणी वाहनांची संख्या वाढतच चालली होती. त्यामुळे परिसरातील रहिवाशांसाठी ही बाब फारच डोकेदुखी ठरत होती. याबाबत डेक्कन जिमखाना परिसरातील नागरीक येथील वाहनांची पार्किंग हटवण्यासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा करत होते. मात्र आता वाहतूक

शाखेकडून डेक्कन जिमखाना परिसरातील गुडलक शेजारच्या गल्लीत हॉटेलमध्ये वाहने पार्क करण्याला परवानगी नाकारली आहे.याबाबतचे आदेश वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त राहुल श्रीरामे यांनी दिले आहे.

पुणे महापालिकेला सुद्धा या रस्त्यावरच्या पार्किंगला मनाई असल्याचे फलक लावण्यासंबंधी पत्र पाठवण्यात आले आहे. येत्या काही दिवसांत परिसरात नो पार्किंगचे फलक देखील लावण्यात येणार असल्याची माहिती आहे.

अर्ज क्र. सीएए.२

[कलम २३० (३) आणिनियम ६ आणि ७ च्या अनुषंगाने]

माननीयराष्ट्रीय कंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबईन्यायपीठह्यांच्या समोरकंपनी योजना अर्ज क्र. १११३/ २०२०

ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड .... अर्जदारकंपनी क्र. १/ हस्तांतरण कर्ता कंपनी

जैनसन्सफिनलीझ लिमिटेड

(आता अश्व फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात).... अर्जदारकंपनी क्र. १/ हस्तांतरीती कर्ता कंपनी

ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड आणि अश्व फायनान्स लिमिटेड(पूर्वीची जैनसन्सफिनलीझ लिमिटेड) च्यासमभाग धारक आणि सुरक्षित धनको ह्यांची सभा बोलाविणाऱ्या सूचनेची जाहिरात, जसे लागू असेल त्यानुसार सूचना ह्याद्वारे देण्यात येत आहे की, माननीयराष्ट्रीयकंपनी विधी न्यायाधिकरण, मुंबई न्यायपीठ ("एनसीएलटी") ह्यांच्याद्वारे१ फेब्रुवारी २०२१ रोजी देण्यात आलेल्या आदेशामध्येट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड,(हस्तांतरणकर्ता कंपनी) ह्यांचे समभाग धारक आणि अश्वफायनान्सलिमिटेड (हस्तांतरीती कंपनी) चे समभाग धारक आणि सुरक्षित धनको ह्यांच्या वेगवेगळ्या सभा (ह्यानंतरसंयुक्तपणे"सभा" असा उल्लेख असलेले) जसे शक्य असेल त्याप्रमाणे हस्तांतर कर्ता कंपनी आणि हस्तांतरीती कंपनी आणि त्यांच्या संबंधित समभागधारकांमध्येव्यवस्थेच्या("योजना") प्रस्तावित योजनेवर विचार करण्यासाठी आणि जर योग्य वाटल्यास त्यासह किंवा त्यामध्ये काही फेरफार करून संमत करण्यासाठीसभा घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आदेशाच्या पूर्ततेसाठी आणित्यामध्ये देण्यात आलेल्या निर्देशांच्या अनुसार ह्याद्वारे ह्याद्वे सूचना देण्यात येत आहे की ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड, (हस्तांतरणकर्ता कंपनी) ह्यांचे समभाग धारक आणि अश्वफायनान्सलिमिटेड (हस्तांतरीती कंपनी) चे समभाग धारक आणि सुरक्षित धनको ह्यांच्या वेगवेगळ्या सभा खालील प्रमाणेघेण्यात येणार आहेत.

तपशिल	वेळ	दिवस आणि दिनांक	ठिकाण
ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेडच्या समभागधारकांची सभा	स. १०.३० वा. (१०.३० वा.)	शुक्रवार १९ मार्च २०२१	ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड चेनोंदणीकृत कार्यालयः १३ बी, ६ वा मजला, टेक्नीप्लेक्स II, आयटी पार्क, ऑफवीर सावरकर उड्डाणपूल, गोरेगावपश्चिम, मुंबई ४०००६२
अश्व फायनान्स लिमिटेड च्या समभागधारकांची सभा	दुपारी १२.३० वा. (१२.३० वा.)	शुक्रवार १९ मार्च २०२१	अश्व फायनान्स लिमिटेडचेनोंदणीकृत कार्यालयः १२ बी, ६ वा मजला, टेक्नीप्लेक्स II, आयटी पार्क, ऑफवीर सावरकर उड्डाणपूल, गोरेगावपश्चिम, मुंबई ४०००६२
अश्व फायनान्स लिमिटेड च्यासुरक्षित धनकोंची सभा	दुपारी ४.३० वा. १६.००	शुक्रवार १९ मार्च २०२१	

समभाग धारक आणि सुरक्षित धनको ह्यांना निश्चित करण्यात आलेले दिनांक, वेळ आणि ठिकाणी सभेला हजर राहण्याचे निर्देश देण्यात येत आहेत. योजनेच्या प्रती, कलम २३० च्या अंतर्गत निवेदन आणि निश्चित दिनांकामध्ये बदल करण्यासाठी संचालक मंडळाचा ठराव अनुक्रमेट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड आणिअश्व फायनान्स लिमिटेड ह्यांच्यानोंदणीकृत कार्यालयामधून प्राप्त करता येईल. सभेला हजर राहण्यास आणि मतदान करण्यास पात्र असलेले व्यक्तिशः किंवा प्रतिनिधी द्वारे मतदान करू शकतात त्यासाठी प्रतिनिधीने उपलब्ध करून देण्यात आलेला अर्ज अशा व्यक्तीने पूर्ण भरूनट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड आणिअश्व फायनान्स लिमिटेड ह्यांच्यानोंदणीकृत कार्यालयामध्येसभेसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या ४८ तास अगोदर जमा करावे.ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड आणिअश्व फायनान्स लिमिटेड ह्यांच्यानोंदणीकृत कार्यालयामध्ये प्रतिनिधी अर्ज निशुल्क उपलब्ध आहेत.

एनसीएलटी ने ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेडचे संचालक श्री. आत्रेयरायाप्रोलूह्यांची आणि त्यांच्या गैर हजेरीमध्ये ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड चेआणखीन एक संचालक श्री विनीतचंद्र राय ह्यांचीट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड च्या समभाग धारकांच्या सभेसाठी अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. एनसीएलटी ने अश्व फायनान्स लिमिटेडचेव्यवस्थापकीय संचालक श्री. निलेश कुमार सिन्हा आणि त्यांच्या गैर हजेरीमध्ये अश्व फायनान्स लिमिटेडचेसंचालक श्री अनुराग अग्रवाल ह्यांचीअश्व फायनान्स लिमिटेडचे समभाग धारक आणि सुरक्षित धनको ह्यांच्या सभेसाठी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. सभेमध्ये जर योजना संमत झाली तर एनसीएलटी च्या संमतीवर आधारीत असेल. त्याशिवाय,ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेडच्या सम भाग धारकांना आणिअश्व फायनान्स लिमिटेडच्यासम भाग धारक आणि सुरक्षित धनको ह्यांना ह्याद्वारे सूचना देण्यात येत आहे की

(i) सभेच्या ठिकाणी मतदान हे मतदान पत्रिकेद्वारे घेण्यात येईल

(ii) सभेच्या ठिकाणी ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड आणिअश्व फायनान्स लिमिटेड च्या समभाग धारकांच्या मतदानाची पात्रता निश्चित करण्यासाठी ३१डिसेंबर २०२० हा दिनांक निश्चित करण्यात आला होता. अश्या व्यक्ती जे ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड आणिअश्व फायनान्स लिमिटेड चे सभासद कट ऑफ दिनांकाच्या अनुसार नाहीत त्यांनी सदर सूचना ही केवळ त्यांच्या माहीतीसाठ असल्याचे समजावे.

(iii)सभेच्या ठिकाणी अश्व फायनान्स लिमिटेडच्यासुरक्षित धनकोंच्या सभे मध्ये मतदानासाठीसुरक्षित धनकोंची पात्रता निश्चित करण्यासाठी ३१डिसेंबर २०२० हा दिनांक निश्चित करण्यात आला होता.अशा व्यक्ती ज्या अश्व फायनान्स लिमिटेड चेसुरक्षित ऋणकोकट ऑफ दिनांकाच्या अनुसार नाहीत त्यांनी सदर सूचना ही केवळ त्यांच्या माहीतीसाठ असल्याचे समजावे.

(iv)ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड आणिअश्व फायनान्स लिमिटेड चे समभाग धारक आणि सुरक्षित धनको जे लागू असेल त्यानुसार कट ऑफ दिनांकाला त्यांनी धारण केलेल्या समभागांच्या गुणोत्तर आणि कट ऑफ दिनांकाला असलेल्या थकीत देण्याच्या अनुसार सभेच्या ठिकाणी मतदान करण्यासाठीचे प्रमाण निश्चित करण्यात येईल.

(v) आदेशामध्येदेण्यातआलेल्यानिर्देशांच्याअनुसारसभेसाठीआवश्यकगणपूर्ती०२ (दोन) व्यक्तींचीअसेल.

(vi)ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड चे समभाग धारकह्यांच्यासाठी१९ मार्च २०२१ रोजी स. १०.३० वा. पासून किंवा सभेसाठी आवश्यक गणपूर्ती झाल्यानंतर सुरु होईल आणि त्याच दिवशी दुपारी १२.०० वा. समाप्त होईल.

(vii) अश्व फायनान्स लिमिटेड चे समभाग धारकह्यांच्यासाठी१९ मार्च २०२१ रोजी दुपारी १२.३० वा. पासून किंवा सभेसाठी आवश्यक गणपूर्ती झाल्यानंतर सुरु होईल आणि त्याच दिवशी दुपारी २.०० वा. समाप्त होईल.

(viii)अश्व फायनान्स लिमिटेड चेसुरक्षित धनकोह्यांच्यासाठी१९ मार्च २०२१ रोजी सायं.४.३० वा. पासून किंवा सभेसाठी आवश्यक गणपूर्ती झाल्यानंतर सुरु होईल आणि त्याच दिवशी दुपारी ५.३० वा. समाप्त होईल.

(ix)ट्राईब टेकप्रायव्हेट लिमिटेड आणिअश्व फायनान्स लिमिटेडह्यांनीस्पष्टीकरण निवेदन, प्रतिनिधी अर्ज, प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरूपात भाग धारणा करणाऱ्या प्रत्येक समभागधारकासाठी आणिथकबाकी असलेल्या प्रत्येक धनकोसाठी अटेंडंस स्लीपसहसर्व सूचना असलेली सभेची सूचना पाठविण्याचे काम १७ फेब्रुवारी २०२१ रोजी पूर्ण झाले आहे.

(x) एनसीएलटी ने दिलेल्या निर्देशांच्या अनुसार आशिष के. भट्टअँडअसोसिएटसचेस्वतांत्रपणेकार्यरत असलेले कंपनी सचिव श्री. आशिष भट्ट ह्यांची सभेचे आयोजन न्याय आणि पारदर्शी पद्धतीने होण्यासाठी छाननी कर्ते म्हणून नियुक्